







# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०२.०८.२०२५ | अंक नं. १०६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






















## नगरमधील बसस्थानकातील चोऱ्या थांबता थांबेनात; वारंवार दागिने, रोकड जातेयं चोरीला; पोलिसांचे दुर्लक्ष

नगर - नगर शहरातील माळीवाडा बसस्थानकासह स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात गेल्या काही दिवसांमध्ये पाकीट चोरी, दागिने, पर्स चोरीच्या घटना वाढल्या आहेत. याशिवाय विविध प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांचा या ठिकाणी असलेला मुक्त वावर पाहता ही बसस्थानके गुन्हेगारांचे अड्डे बनले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरटे सक्रिय झाले असताना आणि वारंवार चोऱ्या करत असताना पोलिसांकडून मात्र या चोऱ्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे.

नगर शहर हे उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाड्याला जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्याने शहरातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रवाशांची जुन्या बसस्थानकात तर परजिल्ह्यात जाणाऱ्या प्रवाशांची पुणे बसस्थानकात दररोज मोठी गर्दी होत असते. यात विशेषतः महिलांना एस.टी. बस प्रवाशी भाड्यात राज्य सरकारने सवलत जाहीर केलेली असल्याने एस टी बस प्रवासासाठी महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांची गर्दी वाढण्याबरोबरच या गर्दीत बसमध्ये चढताना, उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्समधील दागिने, पैसे चोरी जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. चोरटे गर्दीत मिसळून हातसफाई करत आहेत. गेल्या काही दिवसांत या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नगरमधील बस स्थानके चोरट्यांचे अड्डे बनले असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

### रक्षाबंधनच्या काळात तरी उपाययोजना कराव्यात

पुढील आठवड्यात ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन आहे. त्यामुळे या काळात बसने प्रवास करण्यासाठी महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे. या गर्दीत महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्समधील दागिने, पैसे चोरी होण्याच्या घटना वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे या काळात तरी शहरातील माळीवाडा, स्वस्तिक व तारकपूर या तिन्ही बसस्थानकावर चोरट्यांना पकडण्यासाठी साध्या वेशातील महिला व पुरुष पोलिस कर्मचारी तैनात करण्याची तसेच चोऱ्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच महिलांनीही प्रवास करताना आपले दागिने, पैसे या मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे गरजेचे आहे.

### स्वस्तिक बसस्थानकातून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण लंपास

नगरहुन कडा आष्टी येथे एसटी बसने जाण्यासाठी गर्दीतून आत प्रवेश करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण चोरट्याने गर्दीचा फायदा घेत नजर चुकवून चोरुन नेले. ही घटना स्वस्तिक चौक येथील स्वस्तिक बसस्थानक येथे ३१ जुलै रोजी रात्री घडली.

याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात सौ.आशा दिलीप नाथ (वय ५५, रा. भाजी मंडईजवळ, कडा, ता. आष्टी, जि. बीड) यांनी फिर्याद दाखल केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार ३१ जुलै रोजी रात्री १० वाजता फिर्यादी त्यांच्या पतीसह कडा येथे जाण्यासाठी स्वस्तिक बसस्थानक येथे बसची वाट पाहत होत्या. त्यावेळी वसई-अंबाजोगाई ही बस आल्यानंतर त्या बसमध्ये बसण्यासाठी गर्दीतून आत प्रवेश करीत असताना चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन नजर चुकवून फिर्यादी यांच्या गळ्यातील २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण चोरुन नेले. फिर्यादी यांनी पतीसह बसमध्ये प्रवेश केला. मात्र, बसमध्ये बसल्यानंतर त्यांना त्यांच्या गळ्यात गंठण नसल्याचे लक्षात आले. फिर्यादी यांनी बसमध्ये व बसस्थानक परिसरात शोध घेतला, मात्र गंठण न मिळाल्याने कोणीतरी गर्दीचा फायदा घेत त्यांच्या नकळत ते चोरले असल्याची खात्री झाली.

रात्री उशीर झाल्याने त्यांनी त्वरित तक्रार न देता घरी गेल्या व दुसऱ्या दिवशी त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी सौ.आशा नाथ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध बी एन एस ३०३ (२) प्रमाणे चोरी केल्याचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास महिला पोलीस नाईक योगिता साळवे या करीत आहेत.

## पतीच्या मृत्यूनंतर पत्नीने मुलीसह तलावात उडी घेत केली आत्महत्या


सुरेखा औटी


शिवांजली औटी

नगर -पतीच्या अपघाती मृत्युमुळे नैराश्यग्रस्त पत्नीने मुलीसह आपल्या शेताजवळील तलावात उडी मारुन आत्महत्या केली. ही घटना १ ऑगस्ट रोजी पहाटे १.३० च्या सुमारास पारनेर जवळील कन्हेर ओहळ शिवारात उघडकीस आली. सुरेखा दत्तात्रेय औटी (वय ४२) व शिवांजली दत्तात्रेय औटी (वय २१) अशी माय लेकींची नावे आहेत. सुरेखा यांचे पती दत्तात्रेय औटी यांचे पारनेर - सुपे रस्त्यावरील अपघातात ६ महिन्यांपूर्वी निधन झाले होते. या हृदयद्रावक घटनेमुळे पारनेर पंचक्रोशीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पारनेर शहरात वास्तव्यास असलेल्या सुरेखा व शिवांजली नेहमीप्रमाणे शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या आपल्या शेतीत काम करण्यासाठी ३१ जुलै सकाळी ११ वाजेच्या सुमारास गेल्या होत्या.त्यांनी संध्याकाळी साडेसहा वाजेपर्यंत काम केले.काम संपवून घराकडे परतण्याऐवजी त्यांनी शेताजवळील तलावात उडी घेऊन आपले जीवन संपवले.

७ वाजून गेल्यावरही आपली आई व बहीण घरी न परतल्याने सुरेखा यांचा मुलगा तेजसने, शेताजवळ वास्तव्यास असणाऱ्या आपल्या चुलत्यांशी संपर्क साधून आई व बहीण घरी आल्या नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी, शेजाऱ्यांनी दोघींचा शोध सुरु केला. परंतु शोध न लागल्याने रात्री ११ वाजता पारनेर पोलिस ठाण्यात दोघी हरवल्याची फिर्याद दाखल करण्यात आली. फिर्याद दाखल झाल्यानंतर पोलिस पथकाने सुरेखा यांच्या मोबाईलचे लोकेशन तपासले असता तलावाजवळ मोबाईल असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून पोलिस व नातेवाईकांनी तलावाच्या परिसरात शोध घेण्यास सुरुवात केली.रात्री दीड वाजता सुरेखा यांची पिशवी व त्यातील मोबाईल तलावाच्या काठावर आढळून आले. तेथून जवळच असलेल्या तलावाच्या डोहात सुरेखा व शिवांजली यांचे मृतदेह तरंगत असल्याचे दिसून आले.

तलावातून दोन्ही मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी टाकळी ढोकेश्वर येथील रुग्णालयात पाठवण्यात आले. १ ऑगस्ट रोजी दुपारी शवविच्छेदन झाल्यानंतर दोघींच्या मृतदेहावर दुपारी ४ वाजेच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. सुरेखा यांचा मुलगा तेजस नुकताच १२ वीची परिक्षा पास झाला आहे. ६ महिन्यांपूर्वी तेजसच्या वडिलांचे छत्र हरपले. तर आता आई आणि बहिणही सोडून गेल्याने १८ वर्षांच्या तेजसवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.























# गृहिणी

## आरोग्य

### कॉफी पिणे धोकादायक

अनेक लोकांना जेवताना किंवा जेवण्याच्या आधी किंवा नंतर कॉफी पिण्याची सवय असते. असे करणे नुकसान कारक ठरते कारण याने शरीरात आयरनचे शोषण बाधित होत. जेवल्यानंतर कॉफीचे सेवन करण्यात किमान एक तासाचे अंतर असावे. आपण ॲनिमिक असाल तर हे अधिक आवश्यक होऊन जाते. तसेच संध्याकाळनंतर कॉफी पिल्याने झोपमोडीचा आजार जडू शकतो.

### आरोग्यदायी मसाला टी

मसाला चहा बनविण्यासाठी ज्या मसाल्यांची गरज असते ते आपल्या घरात सहजरीत्या उपलब्ध असतात, जसे की लवंग, वेलची, आलं, दालचिनी, तुळस आणि चहापत्ती. चहामध्ये वापरले जाणाऱ्या या सर्व मसाल्यांचे आपल्याला फायदे आहे. विचार करा हे सर्व मसाले एकत्रित्या वापरले तर या पासून मिळणारे फायदे किती पटीने वाढतील.

## पाककला

### स्ट्रॉबेरी केक

**साहित्य** – ३०० ग्रॅम व्हॅनिला स्पंज, १०० ग्रॅम क्रिम, ६० मिली साखरेचे सिरप, ९० ग्रॅम स्ट्रॉबेरी, १०० मिली स्ट्रॉबेरी पल्प.

**कृती** – प्रथम व्हॅनिला स्पंज तीन भागात मधून कापून घ्या. नंतर स्पंजच्या तिन्ही तुकड्यांवर साखरेचे सिरप लावून घ्या. त्यानंतर प्रत्येक तुकड्यावर दोन्ही बाजूंनी क्रिम लावून घ्या आणि त्यावर स्ट्रॉबेरीचे तुकडे ठेवा. त्याचे एकावर एक थर रचून वरील थरावर स्ट्रॉबेरीचा पल्प लावा. नंतर त्यावर स्ट्रॉबेरीच्या तुकड्यांची सजावट करा. घरच्याघरी फ्रेश स्ट्रॉबेरी केक तयार.

## सल्ला

घरातून बाहेर पडताना सनस्क्रीन क्रीम चा वापर केल्यास उन्हापासून त्वचा सुरक्षित राहाते. उन्हाळ्यात घामाद्वारे शरीरातील खूप सारे पाणी आटते अशावेळी त्वचेला रुक्षपणापासून वाचवण्यासाठी भरपूर पाणी प्या.

## वास्तू

झोपताना दक्षिणेकडे पाय करून झोपू नये ही भ्रामक व कल्पित समजूत नाही, याला विज्ञानाचा आधार आहे. दक्षिणेला पाय केल्यास मेंदूला रक्तपुरवठा अनियमित होऊ शकतो. त्यामुळे दिवसभर बेचैनी आळस जाणवतो. शारीरिक व मानसिक संतुलन बिघडण्याचा मोठा धोका असतो. रोजच अशाप्रकारे झोपल्यास असाध्य व्याधी किंवा आजार होण्याची शक्यता असते.

* लक्ष्मीची पावले, शुभ-लाभ या व्यतिरिक्त स्वस्तिकचे निशाणी घराच्या दरवाजावर लावणे शुभ मानले जाते. असे केल्याने सौभाग्य आणि समृद्धी वेगाने वाढते.

## सौंदर्य

* चेहऱ्यावर फेस मास्क वापरा. यामुळे उन्हात करपणाऱ्या त्वचेला गारवा मिळेल. फेसमास्कसाठी संत्री, पपई, द्राक्षे, काकडी इत्यादींचा वापर करा. फळ मिक्सरमध्ये बारीक करून गर लावा. १०-१५ मिनिटांनंतर पाण्याने चेहरा स्वच्छ करा.

* जेव्हा आपण शांत असतो तेव्हा ताणतणावाचे बाह्याविष्कार म्हणजे चेहऱ्यावरील पिटिका व ठिपके कमी होतात. सुदर्शन क्रिया, जे एक उत्तम श्वसनाचे तंत्र आहे, साठलेले ताणतणाव शरीर व मनाबाहेर फेकते आणि आपल्याला शांत करते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ३ ऑगस्ट २०२५

---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, विशाखा ०६।३५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३४ मि.

### राशिभविष्य

**मेष** : आज नवीन संबंध स्थापित करणे, माहितीची देवाण-घेवाण व मीटिंग्च्या माध्यमातून शिकवण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : कसोटी घेणारा हा दिवस आहे. आपणास अधीक आत्मविश्वासाने परिपूर्ण वाटेल आणि कोणत्याही प्रतिस्पर्धी प्रयत्नासाठी हा वेळ उत्तम आहे.

**मिथुन** : महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेले कामे पूर्ण होतील.

**कर्क** : लोकांमध्ये मतभेद आणि अनोळखी लोकांचा विरोध आपणास अस्वस्थ करू शकतो.

**सिंह** : वेळेकडे लक्ष ठेवा. कार्यात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. जुने मित्र भेटतील. सार्वजनिक संपर्कातून दिवस थोडा प्रतिकूल राहिल.

**कन्या** : मनातल्या इच्छा पूर्ण होतील. उत्साहजनक बातम्या मिळतील. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. उधारी उसनवारी वसुल होईल. मागील देणीही मिटतील.

**तूळ** : कौटुंबिक वातावरण आनंद आणेल. आर्थिक विषयांमध्ये आपल्या प्रयत्नांमुळे आपणास यश मिळेल. उत्तम प्रकारचे विवाहसौख्य प्राप्त होईल.

**वृश्चिक** : करियरबद्दल आपण हट्ट धरू शकता. कठोर परिश्रम केल्यानंतर यश मिळेल. परंतु प्रयत्न करताना अती घाई करणे टाळावे.

**धनु** : महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही. उत्साहवर्धक बातमी मिळाल्याने आनंद होईल. मानसिक समाधान लाभेल.


**मकर** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. मातृ-पितृचिंता सतावेल.

**कुंभ** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्या.


**मीन** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

## शब्दगंध क्र. ७२३४ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२३३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) केस काळे करण्याचे रसायन २) हाताचे किंवा पायाचे सर्वात लहान बोट ३) निवडणुकीतील मुख्य प्रक्रिया ४) कमतरता; उणीव; कसर ५) रड, रडगाणे ८) 'दासबोध' ग्रंथ रचणारे मराठी संत १०) दर; भाव; जमिनीचा सारा; ठराविक पद्धती १२) अधर्म; पातक १३) तृप्ती; संतोष; शंकानिवृत्ती १४) गोळा करणे; जमविणे १६) बालक; लहान मूल १७) विभागणी; वितरण; वाटणी १८) एक फळ ज्यात गरे असतात

**उभे शब्द :-** १) सुवर्ण; कांचन; सोने ३) धार्मिक शिक्षण देणारी मुस्लिमांची शाळा ६) रंग किंवा मौज उत्पन्न करणारे (सोहळा वगैरे) ७) फुलातील रज:कण ९) चावण्याचा अवयव; दंत ११) साखर वगैरेच्या पाकातील मळ १२) एक द्रवरूप धातू १३) नेहमी ; हमेशा १४) कामबंद आंदोलन; हरताळ १५) उदाहरणादाखल; नमुनेदार १९) कपट; कारस्थान; कावा २०) श्रीरामाचा एक भाऊ २१) सुंदर (पुरुष)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आपल्या ध्येयाचा कधीही विसर पडू देऊ नका; नाहीतर तुम्हाला जे काही प्राप्त होईल त्यातच तुम्हाला समाधान वाटत राहील.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### फेअरनेस क्रीम लावून रंग गोरा होतो का?

लहानपणी अंगाला खूप साबण लावून रंग गोरा करण्याच्या प्रयत्नात जीव गमावणाऱ्या कावळ्याची कथा आपण सर्वांनीच वाचली आहे. त्यामुळे त्वचेचा रंग बदलवण्याचा दावा करणाऱ्या सौंदर्य प्रसाधनांच्या उपयुक्ततेविषयी तुमच्या मनात नक्की संभ्रम निर्माण झाला असेल. त्वचेत असणाऱ्या मेलॅनीन या रंगद्रव्याच्या प्रमाणावर त्वचेचा रंग अवलंबून असतो. हे द्रव्य जास्त असल्यास रंग काळा, तर कमी असल्यास गोरा असतो. या रंगद्रव्याचे प्रमाण हे मुख्यतः अनुवंशिक कारणावर अवलंबून असते. मात्र पर्यावरणाचा देखील त्यावर परिणाम होत असतो. म्हणूनच एखाद्या व्यक्तीने सतत रणरणत्या उन्हात काम केले तर तिचा रंग काळवंडतो. मेलॅनीन खेरीज केरॅटीन हे पिवळसर रंगद्रव्य व हिमोग्लोबिन हा रक्तातील लाल रंगाचा घटक यावरही त्वचेचा रंग अवलंबून असतो.

हर्बल वा इतर विशेषणे लावून विकल्या जाणाऱ्या फेअरनेस क्रीममुळे अनुवंशिक घटकांवर काहीच परिणाम होणार नाही. या क्रीममुळे अनुवंशिक घटकांवर काहीच परिणाम होणार नाही. या क्रीममुळे त्वचेवर होणारा सुर्यप्रकाशाचा परिणाम काही अंशी कमी करता येऊ शकेल. परंतु ही क्रीम लावून काळ्या रंगाची व्यक्ती लख्ख गोरी होणार नाही हे अगदी सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे!

उन्हात न जाणे, गेल्यास चेहऱ्याला स्कार्फ बांधणे, चेहरा दिवसात चार पाच वेळा स्वच्छ पाण्याने धुणे, समतोल आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, जागरण टाळणे या उपायांनी महागड्या फेअरनेस क्रीमइतकाच वा जास्तच परिणाम होईल यात शंका नाही. महत्त्वाचे म्हणजे रंगावर माणसाचे गुण अवलंबून नसतात. मग रंगामध्ये धावायचे कशासाठी याचाही विचार करायला हवा. म्हणूनच संत 'काय भुललासी वरलिया रंगा...' असे म्हटले असतील का?'

### धैर्याचे महत्त्व

धैर्यधर नावाचे एक व्यापारी होते. व्यापार उत्तम चालत होता. आमदनी उत्तम होती. अर्थातच धैर्यधरांनी प्रामाणिकपणे ही संपत्ती कमावली होती. लोक त्यांना गमतीनं म्हणायचे, तुमचं नाव धैर्यधर आहे, पण तुम्ही आहात लक्ष्मीधर. होय, मी लक्ष्मीधर आहे; पण मूळचा मी धैर्यधरच खरा. धैर्यधर म्हणाले. बरीच वर्षे व्यापार केला. संसार सुखाचा झाला. आता जरा स्वास्थ्य आलं. धैर्यधरांनी विचार केला. 'आता जरा हिंडावं, फिरावं, देश बघावा. तीर्थयात्रा करावी, जीवनाचा आनंद लुटावा. मग आपले सेवक आणि आपला एक पुतण्या यांच्यावर कारभार सोपवून धैर्यधर तीर्थयात्रेला गेले. काशी-रामेश्वर, हिमालयात गेले. दोन महिने ते बाहेर होते. आता परत आलो की, पेढीवर बसायचं या उद्देशाने ते परतीच्या वाटेला लागले. पण परत येऊन बघतात तो काय? पुतण्या आणि सेवक घरात हताशपणे बसले होते. काय झालं ?'

धैर्यधरांनी विचारलं. 'आपलं दुकान, पेढी सर्व आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं. काही राहिलं नाही. आम्हीच कसेतरी वाचलो. आग कशी लागली समजलं नाही. पुतण्या म्हणाला. धैर्यधरांनाही क्षणभर अस्वस्थ वाटलं. पण ते म्हणाले, ठीक आहे. आता पुढे काय करायचं ते ठरवू बऱ्याच लोकांना वाटलं, 'आता काय होणार? सगळी राख झाली. आता धैर्यधर पुन्हा व्यवसाय सुरू करणार नाहीत.'

दुसऱ्याच दिवशी त्या जळालेल्या दुकानावर लोकांना एक फलक दिसला. 'दुकान जळलं. पेढी जळली, सारं काही जळलं; पण धैर्य नाही जळलं! उद्यापासून दुकान पुन्हा सुरू करीत आहोत.' लोकांना पटलं की, धैर्यधर हे नुसतेच लक्ष्मीधर नसून खरेच धैर्यधर आहेत.

**तात्पर्य** : संकटाना धैर्याने तोंड दिलं तर मार्ग सापडतो.



## जीवन का अमृत (भाग १)

### गुरू और परमात्मा

यदि हम अपने आप की तुलना पशुओं के बच्चों से करें, तो हमें मालूम होता है कि वे खाना, पीना, चलना बहुत जल्दी सीख जाते हैं। जब हमारी आत्मा इंसानी शरीर धारण करती है, तो माँ-बाप उसे चलना सिखाते हैं, पढ़ने-लिखने भेजते हैं और जैसे-जैसे हम बड़े होते हैं, हमें नई-नई चीजें सीखनी पड़ती हैं और हमें कई प्रकार की जिम्मेदारियों को निभाना पड़ता है। यदि हम हिन्दुस्तान में जन्म लेते हैं, तो हमें हिन्दी बहुत जल्दी आ जाती है और अमरीका में पैदा होते हैं, तो हमें अंग्रेजी बहुत जल्दी आ जाती है। इस प्रकार २० से २५ वर्ष हमारे पढ़ाई-लिखाई में व्यतीत हो

(क्रमश:)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

'चल उड जा रे पंछी

कि अब यह देश हुआ बेगाना!'

दादी जानकी का पूरा जीवन ऐसे अध्ययन और अभ्यास को समर्पित रहा है, जो किसी भी व्यक्ति को उन्नत कर सकता है। वरिष्ठ या श्रेष्ठ होने के अर्थ में नहीं, बल्कि सेवा करने योग्य होने के अर्थ में, जब हम ईश्वर से सहारा लेते हैं, तो वह हमें खुशी से देता है, हम न केवल यह महसूस करते है कि 'मैं ईश्वर की हूँ', बल्कि यह भी कि 'ईश्वर मेरा है' । दादी कहती हैं, ''परमात्मा आपकी तरफ हो, यह कोई मामूली बात नहीं है।''

(क्रमश:)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

## साहित्य सहवास - 'तो' असतोच सोबत...

आजचं युग हे स्पर्धेचं युग आहे. स्पर्धेत टिकण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतोच, असायलाच पाहिजे. ह्या स्पर्धेमुळंच आपल्यात जिगर निर्माण होते, यश मिळवण्यासाठी अथक परिश्रम घेण्याची तयारी करावी लागते. सकारात्मक विचार करण्याची वृत्ती, धारणा वाढीस लागते. आपल्याला सिध्द करण्याची संधी फक्त आणि फक्त स्पर्धेमुळंच मिळते हे आपल्या लक्षात येईल. एकांकिका स्पर्धा, नाट्य स्पर्धा, लघुचित्रपट स्पर्धा, गायन स्पर्धा, एकल तसेच ड्युएट आणि समुह नृत्य स्पर्धा, धावण्याची स्पर्धा, बुध्दीबळ स्पर्धा ह्यांसारख्या अनेक प्रकारच्या स्पर्धा नियमितपणे आयोजित केल्या जातात. स्पर्धेत जिंकण्याच्या दृष्टीने सराव सुरु होतो. मीच अथवा आपला संघच जिंकणार ह्या दृष्टीने तयारी सुरु होते. म्हणजेच स्पर्धेमुळं सकारात्मक विचारांचं बीज पेरलं जातं.

धावण्याची स्पर्धा त्या शहरात अगदी सहा महिने आधीच जाहिर झाली. प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे पंचवीस हजार, पंधरा हजार आणि पाच हजार रुपयांचं बक्षिस जाहिर झालं. शेकडो व्यक्तींनी ह्या स्पर्धेत सहभाग नोंदवला. काही कॉलनी, अपार्टमेन्ट, प्रभागातील मुलांनीही सहभाग घेतला. एकत्रितपणे धावण्याचा सराव सुरु झाला. एका कॉलनीत आंतरराष्ट्रीय धावपटू आहे. त्याने त्याच्या कॉलनीतील सत्तावीस मुलांना स्पर्धे विषयी, नियमांविषयी, आहार विहार, व्यायामाविषयी अगदी बारिक तपशील सुध्दा सांगितला आणि सराव सुरु झाला. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला अगदी म नापासून वाटायचं पंचवीस हजारांचं बक्षिस माझंच. अगदी काही व्यक्तींना... आणि प्रथम क्रमांकाचं बक्षिस पंचवीस हजार रुपये ह्यांना मिळालं आहे असं स्वप्नही पडलं. मग त्या स्वप्नाचा पाठलाग अगदी जोरदार सुरु झाला. स्पर्धकांची संख्या दोन हजारांपुढे गेली. जसजशी स्पर्धा अर्थात स्पर्धेचा दिवस जवळ येऊ लागला तसतसे स्पर्धक अधिक जोमाने तयारी करु लागले. आंतरराष्ट्रीय धावपटू असलेल्या व्यक्तीने तयारी करुन घेतली ती फक्त धावण्याची नाही तर यश आणि अपयश कसं पचवायचं ह्याची सुध्दा. सराव सुरु होण्याच्या आधी ते दररोज काही वेळ मुलांशी संवाद साधायचे.

'प्रत्येक स्पर्धक तुमच्यासारखाच जिंकण्यासाठीच स्पर्धेत सहभागी झाला आहे. जो तो ज्याच्या-त्याच्या परीने सराव करतो आहे आणि केलाच पाहिजे. मीच सर्वश्रेष्ठ धावपटू असा विचार कधीच मनात आणु नका. मी पहिला येण्याचा जिद्दीने प्रयत्न करणारंच हा मंत्र जपत राहा तशी कृतीही करा. कदाचित आपल्या कॉलनीमधील एखाद्यालाच तीनपैकी एखादं बक्षिस मिळेल किंवा एकालाही मिळणार नाही त्यावेळी आलेलं अपयशसुध्दा पचवता आलं पाहिजे. कारण जे तिघं विजयी झाले ते तुमच्यापेक्षा जास्त चांगली कामगिरी करु शकले म्हणूनच हे स्वत:ला वारंवार सांगा. सगळ्यात महत्वाचं म्हणजे मी कुठं कमी पडलो ? हा प्रश्न स्वत:ला प्रत्येकाने विचारा आणि त्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घ्याच. ज्यावेळी तुम्ही स्पर्धेत धावणार आहात तेव्हा घड्याळातला सेकंद काटा आणि तुमचे परिश्रमसुध्दा धावणारंच आहेत. त्या विशिष्टवेळी तुम्ही नेमकं कोणती धारणा मनात ठेऊन धावता आहात त्याक्षणी तुमची मानसिकता नेमकी काय आहे? ह्यासह अनेक घटक तुम्ही मि ळवणाऱ्या यशासाठी कारणीभूत आहेत.' मुलं अगदी मन लावून ऐकायची. कॉलनीमध्ये तिघांनी ठरवलं की बक्षिस मिळालं तर बक्षिसाची रक्कम सरांना द्यायची. स्पर्धेचा दिवस उजाडला. सकाळी सहा वाजता दोन हजार स्पर्धक त्या मोकळ्या मैदानावर जमा झाले. प्रत्येकाला चेहरा काही सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. काही क्षणांतच प्रमुख पाहुणे आले. आयोजकांच्या विनंतीनुसार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झेंडा दाखवुन स्पर्धा सुरु झाली. आपल्या स्पर्धकांचं मनोबल वाढवण्यासाठी आलेले चाहते, मित्र-मैत्रीणी, नातेवाईक त्या त्या स्पर्धकाच्या नावाने मोठमोठ्याने ओरडु लागले. जिंकण्याची सिमा रेषा आली. आणि... त्या तिघांच्याही डोळ्यात आनंदाश्रु. प्रत्येकी एका सेकंदाच्या फरकाने कॉलनीमधले ते तिघेही विजेते झाले. बक्षिस वितरण समारंभात पाहुणे म्हणाले पहिल्या क्रमांकाला पंचवीस हजार, तिसऱ्या क्रमांकाला पाच हजार रुपये बक्षिस.

तब्बल वीस हजारांचा फरक. तिसरा विजेता, पहिल्या क्रमांकाच्या स्पर्धकापेक्षा दोन सेकंद उशिराने आला. समय बलवान है हे कायमचं लक्षात ठेवा. तिघांनाही रोख बक्षिसं मिळाली. पैकी एकाने माईक हातात घेऊन आंतरराष्ट्रीय धावपटु कोचला मंचावर बोलावलं. ते मंचावर आले. तिघांनीही ते पंचेचाळीस हजार रुपये त्यांना दिले. त्यांचा आशिर्वाद घेतला. त्यांनी माईक हातात घेतला. ते म्हणाले चौथा जो विजेता आहे तो स्पर्धेत सहभागी झाला कारण बक्षिसाची रक्कम तो त्याच्या अपघातग्रस्त मित्रासाठी देणार होता. त्यांनी त्याला बोलावलं. तो मंचावर आला. ते पंचेचाळीस हजार रुपये त्याला ह्या चौघांनी दिले. तो चौथा विजेता मोठमोठ्याने रडु लागला. टाळ्यांचा कडकडाट खूप वेळ बरंच काही सांगत होता.

(लेख क्र.५६१)

– **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

### हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : आजी, मी पळण्याच्या शर्यतीमध्ये भाग घेतला. सगळी तयारी पूर्ण झाली फक्त तुझ्या आशीर्वादाची गरज आहे. असे म्हणून गण्या आजीच्या पाया पडतो.

आजी : सावकाश पळ रे बाबा!

### करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* सध्या अस्तित्वात असलेली लोकसभा कितवी आहे?

– १७ वी

– **अरविंद ब्राम्हणे**, भिंगार मो. ९४०३७३४२८१

## काय खावे?

### वेलची

लिंबाचे झाड उंच असून, या झाडाला वाकड्या-तिकड्या घनदाट काटेरी फांद्या फुटतात. याची पाने आकाराने गोल असून, त्यांना लिंबासारखाच वास येतो. याची फुले पांढरी व सुगंधी असतात. कच्च्या लिंबाचा रंग हिरवा व पिकलेल्या लिंबाचा रंग पिवळा असतो. लिंबाचे कागदी, जंबेरी, संत्री, साधे, सरबती, इडलिंबू असे प्रमुख प्रकार आढळतात. आपण आहारामध्ये सहसा कागदी लिंबाचा वापर करतो.

**औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार** : लिंबू दीपक, पाचक, हृदय, रक्तपित्तशामक, ज्वरहारक व मूत्रजनन आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपत आहे

### सुनील कटारिया यांचे प्रतिपादन; मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिराला प्रतिसाद, १२५ रुग्णांची मोफत मेंदू विकार तपासणी

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपला जात आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत आहे. आचार्य श्री आनंदऋषीजींच्या जयंतीनिमित्त आरोग्य सेवेच्या महायज्ञाचे कुंड प्रज्वलीत झाले असून, यामध्ये सेवा देण्यासाठी अनेकांचे हात पुढे आले असून, या महायज्ञातून अनेक गरजू रुग्णांना आधार मिळणार असल्याची भावना रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहिल्यानगरचे अध्यक्ष सुनील कटारिया यांनी व्यक्त केली.


आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आनंदऋषीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहिल्यानगरच्या माध्यमातून मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्‌घाटन करताना सुनील कटारिया.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहिल्यानगरच्या माध्यमातून मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी सुनील कटारिया बोलत होते. यावेळी सचिव अमर गुरप, डॉ. शिरीष कटारिया, वसंत मुनोत, विनोद भंडारी, चंद्रकलाबाई कटारिया, संजय कटारिया, सुजाता कटारिया, राजश्री चंगेडिया, संजय मुनोत, करुणा कटारिया, न्युरोलॉजी डॉ. गौतम काळे, डॉ. अद्वैत गीते, डॉ. वैशाली कदम, संतोष बोथरा, सतीश लोढा, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी आदी उपस्थित होते.

पुढे सुनील कटारिया म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेतून ईश्वरसेवा सुरु आहे. या मानवतेच्या सेवा कार्यात कटारिया परिवारचे व रोटरीचे नेहमीच सहकार्य राहणार आहे. हॉस्पिटलच्या सेवा कार्यामुळे जिल्ह्याचे नाव भारतभर झाले असून, वैद्यकीय क्षेत्रात एक आदर्श निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले. तर रोटरी क्लबची माहिती देऊन वडिलांनी केलेल्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन हा सामाजिक वारसा पुढे घेऊन जात असल्याचे स्पष्ट केले.

डॉ. अद्वैत गीते म्हणाले की, मेंदूवरील खर्चिक उपचारासाठी लाखो रुपये लागतात. मात्र आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अल्पदरात ही सेवा दर्जेदार पध्दतीने मिळत आहे. तीन मेंदू विकार तज्ञ हॉस्पिटलमध्ये कार्यरत असून, अद्यावत तंत्रज्ञान सुविधांचा लाभ रुग्णांना दिला जात आहे. तर महात्मा फुले जन आरोग्य योजनेत हे उपचार मोफत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. गौतम काळे यांनी मेंदूवरील विविध थेरपी, उपचार, डोकेदुखी, जेबीएस, पॅरालिसिस, स्मृतीभंश व डोक्यांचे दुर्मिळ आजारावर हॉस्पिटलमध्ये उपचार उपलब्ध असून, तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून अनेक रुग्ण बरे होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या शिबिरात १२५ रुग्णांची मोफत मेंदू विकार तपासणी करण्यात आली. तर गरजूंवर अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२५ द्वैवार्षिक स्पर्धेसाठी नोंदणी सुरू

### युवकांनी सहभागी व्हावे : विनायक देशमुख




नगर – भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने आयोजित केलेल्या इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२५ साठी नोंदणी लिंक उघडली असुन या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना श्री.देशमुख म्हणाले, ही द्वैवार्षिक स्पर्धा भारतातील सर्वात प्रतिभावान तरुणांना ओळखण्यासाठी, त्यांचे पालनपोषण करण्यासाठी आणि त्यांना पुरस्कृत करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आणि त्यांचे कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी तयार करण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्दिष्ट प्रतिभावान तरुणांना व्यावसायिक शिक्षणात करिअर करण्यासाठी आणि आजच्या अर्थव्यवस्थेत कुशल कामाचे महत्त्व ओळखण्यासाठी प्रेरित करणे आहे हा आहे.

या स्पर्धेत ६३ कौशल्ये असतील ज्यासाठी सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रादेशिक स्पर्धा उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम आणि ईशान्य अशा पाच झोन मध्ये आयोजित करण्यात येणार असून अंतिम स्पर्धा एम. एस. डी.ई. द्वारे केंद्रीय स्तरावर होणार आहे. ही स्पर्धा सर्व भारतीय युवकांसाठी खुली असुन सहभागींचे किमान वय १६ वर्षे आणि कमाल वय २५ वर्षे असणे आवश्यक आहे. सायबर सुरक्षा, मेकॅट्रॉनिक्स आणि विमान देखभाल यासारख्या काही प्रगत तंत्रज्ञान कौशल्यांसाठी, सहभागींचा जन्म १ जानेवारी २००१ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी स्किल इंडिया डिजिटल हब पोर्टलवर नोंदणी करू शकतात. नोंदणी पूर्ण करण्याची शेवटची तारीख ३० सप्टेंबर आहे.

राष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्यांना वर्ल्ड स्किल्स स्पर्धा २०२६ आणि इतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी व्यापक प्रशिक्षण देऊन विशेष मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी – www.skillindiadigital.gov.in ला भेट द्यावी.


‘चित्रकूट गुरुकुल’मध्ये संत तुळसीदास जयंती साजरी करण्यात आली.

# ‘चित्रकूट गुरुकुल’मध्ये संत तुळसीदास जयंती साजरी

### परंपरेचे जतन आणि जबाबदारीचे जाणीव करून देणारे भक्तीमय सादरीकरण

नगर – सावेडीतील चित्रकूट गुरुकुलमध्ये तुळसीदास जयंती भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी संत तुळसीदास यांचे बालपण, त्यांचे प्रभू श्रीरामांवरील प्रेम आणि रामचरितमानस व हनुमान चालीसा रचनेमागची प्रेरणा सुंदर अभिनयातून सादर केली.

या प्रसंगी सौरभ साठे यांच्या मधुर आवाजात रामचरितमानस व हनुमान चालीसाचे पठण करण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला.

या कार्यक्रमामागे शाळेचे संचालक संजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले, तर सीईओ अशोक सचदेव यांची परंपरेशी नातं जपणं म्हणजेच खरी शिक्षणप्रक्रिया ही भावना यामागे होती. संपूर्ण आयोजन प्राचार्या सौ. सारिका आनंद यांनी अत्यंत सुंदरपणे पार पाडले.

# मंगळागौर खेळ ही महिलांसाठी पर्वणीच

### धनश्रीताई विखे पाटील यांचे प्रतिपादन; भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे स्पर्धेचे उद्‌घाटन


भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे महिलांसाठी मंगळागौर स्पर्धेचे उद्‌घाटन धनश्रीताई विखेपाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

नगर – भारतीय संस्कृतीत सण उत्सवाला खूप महत्त्व आहे. भाजपा सावेडी मंडलाने महिलांसाठी एक आदर्श, स्तुत्य असा उपक्रम राबवला आहे. महिलांना खरे तर जुने खेळ दाखवून देण्याची संधी मिळाली असून त्यासाठी त्यांची तंदुरुस्ती देखील महत्वाची ठरणार आहे. मंगळागौर सण हा सर्वांना आनंद देणारा सण आहे. पवित्र श्रावण महिन्यामध्ये मंगळागौर सण साजरा करण्यात येतो. मंगळागौर खेळ ही महिलांसाठी खास पर्वणीच आहे. भारतीय जनता पार्टीचे सावेडी मंडळाच्या वतीने महिलांसाठी मंगळागौर खेळाची स्पर्धा चांगल्या पद्धतीने पार पडत आहे. यामुळे महिलांना प्रोत्साहन मिळणार आहे, असे प्रतिपादन धनश्रीताई विखे पाटील यांनी केले आहे.

सावेडी येथील माऊली सभागृहात भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलातर्फे महिलांसाठी प्रथमच घेण्यात येत असलेल्या मंगळागौर स्पर्धेचे उद्‌घाटन धनश्रीताई विखेपाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अभय आगरकर, सावेडीचे मंडलाध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे, वसंत लोढा, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा प्रियाताई जानवे, माजी नगरसेविका मनीषा बारस्कर–काळे, सावेडी महिला मोर्चा अध्यक्षा रेणुका करंदीकर, सरचिटणीस सचिन पारखी, मयूर बोचुघोळ आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात राजेंद्र काळे यांनी सांगितले की, श्रावण महिन्यात अशा प्रकारच्या स्पर्धा पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक अशा मोठ्या शहरांमध्ये होत असतात परंतु यंदा आपण प्रथमच अहिल्यानगर शहरात सावेडी मंडलातर्फे महिलांसाठी अशा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. संपूर्ण शहरातून या स्पर्धेसाठी एकूण १३ संघांनी आपला सहभाग नोंदवला आहे. महिलांच्या या स्पर्धेमुळे आपली जुनी संस्कृती, जुने खेळ जपले जातील, त्याला प्रोत्साहन मिळेल, अशी इच्छा व्यक्त केली.

सूत्रसंचालन वंदना साबळे यांनी केले. रेणुका करंदीकर यांनी आभार मानले. स्पर्धेसाठी महिला मोर्चाचे पदाधिकारी प्रियाताई जानवे, गीतताई गिल्डा, रेणुका करंदीकर, शारदा होशिंग, वंदना पंडित, प्रतिक्षा रसाळ, कालिंदीताई केसकर, सविताताई मोरे, अर्चना बनकर, सोनाली फाटक, सुरेखा जंगम, राखी आहेर, पल्लवी जाधव, श्वेता झोंड, उज्वला भांगे, नितीन शेलार, रामदास आंधळे, साहिल शेख, संपतराव नलवडे, वैभव झोटिंग, सुधीर मंगलारप, अनिरुद्ध घैसास, पुष्कर कुलकर्णी, युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक वाकळे, हेमंत पवार, अक्षय गांगर्डे, अभिजीत गायकवाड इ. परिश्रम घेत आहेत.


आचार्यसम्राट श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने शहरातील नवीपेठमधील जैन स्थानकात दर शुक्रवारी रात्री ९ वाजता जैन श्रावक संघ आणि आनंद गुरूभक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजींच्या जन्मदिनानिमित्त दर शुक्रवारी आनंद चालिसा पाठ

नगर – आचार्यसम्राट श्रीआनंदऋषीजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने शहरातील नवीपेठमधील जैन स्थानकात दर शुक्रवारी रात्री ९ वाजता जैन श्रावक संघ आणि आनंद गुरूभक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

पवित्र श्रावण महिन्यातील पहिल्या शुक्रवारी उत्साहपूर्ण आणि भक्तिपूर्ण वातावरणात या पाठाचा शुभारंभ करण्यात आला, अशी माहिती सुभाष भंडारी व पारस लोढा यांनी दिली.

ते म्हणाले, आनंद चालिसा ही जैन धर्मातील महत्वाची प्रार्थना. ही प्रार्थना आचार्य आनंदऋषीजींचे कार्य आणि शिकवण यांची आठवण करून देते. आनंद चालिसा पाठ श्रध्देने करणारे भक्तांना शांती, समाधान, स्थिरता, आनंद, सकारात्मक ऊर्जा मिळून अध्यात्मिक उन्नती साधते. मन प्रसन्न होते. नकारात्मक विचार दूर जातात. आपल्या हातून कुणाचेही मन दुखावले जाणार नाही, याची काळजी सहजपणे घेतली जाते. आनंदऋषीजींनी दाखवून दिलेल्या मार्गावर जीवनाची वाटचाल करण्याची प्रेरणा मिळते.

नवीपेठमधील जैन स्थानकात आनंद चालिसा पाठ सुरू होताच स्थानकात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. श्रावक संघाच्या मनिषा मुनोत, प्रकाश भळगट आणि पारस गुंदेचा यांनी सुमधूर भक्तिगीते गायिली. या गीतांवर उपस्थितांनी ताल धरला होता. शहराच्या विविध भागांमधील सुमारे ३०० भाविक स्त्री–पुरूष उपस्थित होते. अशोक (बाबुशेठ) बोरा यांनी आभार मानताना दर शुक्रवारी जैन श्रावक संघ आणि आनंद गुरूभक्त परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद चालिसा पाठ होणार असून भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

सुभाष भंडारी, पारस लोढा, देवेंद्र गांधी आणि आनंद भक्तांनी आनंद चालिसा पाठ नियोजनासाठी अथक परिश्रम घेतले. माजी नगराध्यक्षा सौ.लताभाभी लोढा यांनी प्रभावना आणि लकी ड्रॉ च्या आकर्षक बक्षिसांचे वाटप केले.

# दिल्लीगेटला ७ ऑगस्टला भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव



नगर – स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत असलेल्या भगवान जिव्हेश्वर यांच्या जन्मोत्सवास दिल्लीगेट येथील भगवान जिव्हेश्वर मंदिरात ७ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणार आहे, त्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय सागावकर यांनी दिली

दिल्लीगेट परिसरातील जिव्हेश्वर युवक मंडळाच्या वतीने जन्मोत्सवाला २५ वर्षे वर्ष झाले आहे. रौप्य महोत्सवी वर्षात कार्यक्रम करण्यात आले. जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रम सुरु झाले असून ते १० ऑगस्ट पर्यंत चालणार आहेत. दररोज दुपारी ४ वा विविध भजनी मंडळांचे कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी भगवान जिव्हेश्वर पोथी वाचन होणार आहे. ७ ऑगस्टला जन्मोत्सव निम्मित पहाटे ६ वा. डॉ. आदित्य व सौ. सायली खडामकर यांचे हस्ते भगवान श्री जिव्हेश्वर मुर्तीस अभिषेक, आरती, पाळणा, गायन होऊन जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे अहमदनगर शहारामधील स्वकुळसाळी समाजाच्या विविध संस्था च्या वतीने दु. ४ वा सामुहिक मिरवणूकीचे नियोजन करण्यात आले आहे. सर्व समाजबांधवांनी सहकुटुंब मिरवणूकीमध्ये सहभागी व्हावे.

१० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वा होम मिनिस्टर कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. ८ ऑगस्ट रोजी ७ ते १० पर्यंत महाप्रसाद होणार आहे. त्याचा प्रांरभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी गणेश कवडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, संभाजी कदम, गिरीष जाधव, संजय शेंडगे, विक्रम राठोड, सोनली चितळे, सुवर्णा गेनप्पा, शाम नळकांडे, दीपक सूळ, संजय झिंजे, विक्रम पाठक, लक्ष्मीकांत तरोटे आदी उपस्थित राहणार आहेत.

सर्व समाजबांधव यांनी यावर्षी मंडळास सालाबादप्रमाणे तन मन धनाने सहाकार्य करून मंडळाच्या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन संजय सागांवकर, मंदिर कार्यकारणी चेनितीन पावले, राजेंद्र सवई, सचिन क्षीरसागर, सचिन पावले, मुकुंद सावेकर, रोहित सावेकर, संतोष सावेकर, सागर सावेकर, योगेश मानकर, सचिन मानकर, गणेश सवई, सौरभ सावेकर, महिला मंडळाच्या संस्थापक शैला मानकर, अध्यक्षा वनिता मानकर, उपाध्यक्ष अनिता सवई, सचिव कल्याणी पावले आदींसह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.


महावीर इंटरनॅशनल अहिल्यानगर सेंटरच्या वतीने हिंगणगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विशेष शिबिराचे आयोजन करून शाळेतील ४०० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.

# महावीर इंटरनॅशनल, अहिल्यानगर आयोजित शिबिरात चारशे विद्यार्थ्यांची केली नेत्र तपासणी

नगर – महावीर इंटरनॅशनल या सामाजिक संस्थेच्या वतीने हिंगणगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विशेष शिबिराचे आयोजन करून शाळेतील ४०० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. आनंदऋषीजी नेत्रालयाच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात अनेक विद्यार्थ्यांवर सवलतीच्या दरात पुढील नेत्र उपचार करण्यात आले, अशी माहिती महावीर इंटरनॅशनलच्या अहिल्यानगर सेंटरचे अध्यक्ष राजेंद्र बोथरा यांनी दिली.

या शिबिरास उपाध्यक्ष सतीश लोढा, सचिव वसंत बोरा, पर्यावरण विभागाचे प्रमुख धनराज संचेती, महिला अध्यक्षा वर्षा बाफना, सचिव अपर्णा बोथरा आदींसह वीर वीरा मिरॅकल ग्रुपचे सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक जाधव उपस्थित होते. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

धनराज संचेती यांनी प्रास्ताविकात सांगितले, महावीर इंटरनॅशनल विविध स्तरावर वर्षभर समाजिक उपक्रम राबवून मदत कार्य करत आहे. महावीर इंटरनॅशनलचे सर्व सदस्य या कार्यात उत्साहात सहभागी होत आहेत. आनंदऋषीजी नेत्रालयाच्या सहकार्याने झालेल्या या नेत्र तपासणी शिबिरामुळे अनेकांवर चांगले उपचार झाले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज शेटिया यांनी केले. वर्षा बाफना यांनी आभार मानले. यावेळी गौतम बारमेचा, मानकचंद कटारिया, दिलीप कर्नावट, अरुण पारख, नरेंद्र बाफना, सुरेखा संचेती, अज्वाला लोढा, उज्वला बोथरा, सुनीता कार्नावट, सुरेखा पारख आदी उपस्थित होते.

# अवैध सावकारी रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली समितीची बैठक


अवैध सावकारी रोखण्यासाठी आयोजित बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, समवेत उपस्थित अधिकारी. (छाया – लहू दळवी)

नगर – सावकारांच्या जाचाने पिडीत झालेल्या कर्जदार शेतकऱ्यांची व नागरिकांची पिळवणूक थांबविण्यासाठी तसेच अवैध सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी शासन निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीस सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर मंगेश सुरवसे, पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्यासह जिल्ह्यातील सहकार विभागाच्या सर्व तालुका कार्यालयांचे सहाय्यक निबंधक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले की, बेकायदेशीर सावकारीबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. अशी प्रकरणे निकाली काढताना सर्व संबंधितांना नोटीस पोहोच झाल्याची खात्री करूनच प्रकरणे गुणवत्तेवर निकाली काढण्याची सूचना त्यांनी दिल्या. याचबरोबर विनापरवाना सावकारांकडून गरजू व्यावसायिक नागरिक व शेतकरी यांनी कर्ज घेऊ नये. सहकार खात्याकडून परवाना दिलेल्या परवानाधारक सावकारांकडूनच कर्ज घ्यावे. यामुळे अवैध सावकारीला रोखण्यास मदत होईल. जे कोणी अवैध सावकारी करून कर्जदारांना नियमबाह्य पद्धतीने व्याज आकारून त्रास देत असतील अशा व्यक्तीविरुद्ध सहकार विभागाकडे तक्रार दाखल करावी संबंधितांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे यावेळी डॉ. आशिया यांनी सुचित केले.

जिल्ह्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३९ अन्वये अवैध सावकारी केल्याप्रकरणी २० गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. अवैध सावकारीमुळे पीडित कर्जदार शेतकरी व नागरिकांनी न घाबरता पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व सावकारांचे जिल्हा निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर – मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

# महसूल सप्ताहातच ५० हजारांची लाच घेताना तलाठी व त्याच्या साथीदाराला ‘एसीबी’ने पकडले

नगर – घरकुलाच्या बांधकामासाठी नदीपात्रातून वाळू आणल्याने कारवाई टाळण्यासाठी खासगी व्यक्तीमार्फत तलाठ्याने ५० हजारांची लाच स्वीकारल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तलाठी सतीश रखमाजी धरम (४०, रा. मिरी, ता. पाथर्डी) व त्यांचा खासगी सहकारी अक्षय सुभाष घोरपडे (२७, रा. शिंगवे केशव, ता. पाथर्डी) यांना रंगेहाथ पकडले.

पाथर्डी) येथील तिसगाव (ता. शहराजवळील पारेवाडी तक्रारदाराच्या वडिलांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर घरकुलाचे काम सुरू केले होते. त्यासाठी नदीपात्रातून मुरूम व वाळू आणली होती. ३० जुलै रोजी रात्री आडगावचे तलाठी (तिसगावचे प्रभारी) सतीश धरम व महसूल पथकाने हा मुरूम व वाहने पाहून कारवाई करण्याची धमकी दिली. कारवाई नको असल्यास एक लाख रुपये लाचेची मागणी केली. त्यावर तडजोडीनंतर ५० हजार रुपये लाच देण्याचे ठरले. दरम्यान, याबाबत अहिल्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी तक्रारदाराने संपर्क साधला. त्यानुसार, पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ३१ जुलै रोजी मिरी गावातील वीरभद्र मंदिर परिसरात सापळा रचण्यात आला. त्यावेळी तक्रारदाराकडून ५० हजारांची लाच तलाठी धरम यांनी स्वीकारून ती खासगी सहकारी अक्षय घोरपडे याच्याकडे सुपुर्द केल्यावर पथकाने दोघांनाही अटक केली. त्यांच्याविरुद्ध १ ऑगस्ट रोजी पाथर्डी पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला.

दरम्यान, जिल्ह्यात सध्या शासनामार्फत महसूल सप्ताह राबवण्यात येत असून, या काळातच महसूल विभागातील तलाठ्याने लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

# नवजात बाळाच्या पोषणासाठी आणि मातांच्या आरोग्यासाठी स्तनपान आवश्यक : आयुक्त

### यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; १ ते ७ ऑगस्ट दरम्यान जागतिक स्तनपान सप्ताहाचा महापालिकेच्यावतीने शुभारंभ

नगर – स्तनपान हे नवजात बाळाच्या पोषणासाठी, प्रतिकारशक्तीसाठी आणि मातांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या काळात बाटलीने दूध पाजण्याचे प्रमाण वाढत आहे. मात्र, यातून बालकांचे कुपोषित होण्याचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आईने बाटलीऐवजी बाळाला स्वत:चे दूध पाजावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना केले आहे.



अहिल्यानगर महानगरपालिका, अहमदनगर बालरोग तज्ज्ञ संघटना व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान सप्ताहाचा शुभारंभ यशवंत डांगे यांच्या महानगरपालिकेच्या बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटल येथे करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिका, अहमदनगर बालरोग तज्ज्ञ संघटना व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान सप्ताहाचा शुभारंभ यशवंत डांगे यांच्या हस्ते १ ऑगस्ट रोजी महानगरपालिकेच्या बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटल येथे करण्यात आला. यावेळी बालरोग तज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयदीप देशमुख, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कटारिया, बालरोग तज्ज्ञ संघटनेच्या सचिव डॉ. उज्ज्वला शिरसाठ, स्त्रीरोग संघटनेच्या सचिव डॉ. नीलम बागल, रोटरी क्लबच्या संचालिका डॉ. श्रेया खासगीवाले, उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, वैद्यकीय अधिकारी तथा कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप बागल आदी उपस्थित होते.

नवजात बालकाला पहिले सहा महिने केवळ स्तनपान दिले पाहिजे. यातून बाळाला सर्व जीवनसत्त्वे आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे घटक मिळत असतात. ज्यामुळे बाळाला पोटाचे विकार, एलर्जी, अस्थमा, श्वसनाचे विकार होण्याचे धोके कमी होतात. बाळाच्या जन्मानंतर २० मिनिटांच्या आत बाळाला आईच्या छातीवर झोपवून दूध देणे म्हणजे एकप्रकारचे लसीकरणच आहे. येथूनच बाळाची रोगप्रतिकारण शक्ती निर्माण होण्यास सुरुवात होते. स्तनपानामुळे मातांच्या स्तन कर्करोगाचे प्रमाण कमी होते. बाटलीने दूध भरणाऱ्या मातांच्या तुलनेत स्तनपान करणाऱ्या मातांना कमीत कमी कालावधीत वजन कमी करण्यास मदत होते. स्तनपानातून मिळणारे दूध हे अर्भकासाठी सर्वोतम पेय आहे. हे दूध म्हणजे जीवनसत्त्व, प्रथिने आणि बाळाच्या वाढीसाठी आवश्यक असणारी चरबी या सर्व घटकांचा योग्य मिलाप असते. त्यात बरीच प्रतिबंधात्मक द्रव्ये असतात. ज्यामुळे बाळाची प्रतिकारक्षमता वाढीस लागते आणि बाहेरील जंतुसंसर्गापासून, एलर्जी यांसारख्या रोगांचा प्रतिकार करणे शक्य होते, अशा शब्दात उपस्थित बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ज्ञांनी स्तनापानाचे महत्त्व पटवून दिले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे सचिव अमर गुरप यांनी आभार मानले.

# लव्ह जिहादविरोधी कायदा करण्याच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींना राख्या बांधणार : सकल हिंदू समाज

नगर – राज्यात रक्षाबंधनाच्या पवित्र दिवशी सकल हिंदू समाजाच्या वतीने विशेष सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार असून, राज्यातील विविध जिल्ह्यांसह अहिल्यानगर शहरात हिंदू समाजातील महिला आपल्या भागातील आमदार, खासदार, नगरसेवक, स्थानिक पदाधिकारी यांना राखी बांधून महाराष्ट्रात लव्ह जिहादविरोधी कायदा तात्काळ लागू करण्याची मागणी करणार आहेत. ही राखी केवळ नात्याची नाही, तर हिंदू भगिनींच्या सन्मानाची आहे अशा भावनिक पद्धतीने महिलांनी आपली भूमिका व्यक्त केली आहे.

सकल हिंदू समाजाच्या नेतृत्वाखाली या उपक्रमात शेकडो महिला आपला सहभाग नोंदवणार आहेत. अनेक ठिकाणी मंदिर परिसर, वसाहती, गावपंचायती आणि लोकप्रतिनिधींच्या कार्यालयांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. लव्ह जिहादच्या घटनांमध्ये महाराष्ट्रात दिवसेंदिवस वाढ होत असून, अनेक युवती प्रेमाच्या नावाखाली फसवून, नंतर जबरदस्तीने धर्मांतर केल्या जात आहेत. यात अनेक वेळा मानसिक छळ, मारहाण, आणि आत्महत्येपर्यंतच्या घटना घडत आहेत. त्यामुळे अशा घटना रोखण्यासाठी कठोर कायदा गरजेचा असल्याचे मत महिलांनी व्यक्त केले आहे.

उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये आधीच लव्ह जिहादविरोधी कायदा लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्रात मात्र याबाबत अद्याप कोणताही विशेष कायदा अस्तित्वात नसल्याने अशा गुन्ह्यांवर कारवाई करताना पोलिसांनाही अडचणी येतात. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने हा कायदा संमत करून अमलात आणावा, अशी मागणी यावेळी करण्यात येणार आहे.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिण आपल्या भावाच्या रक्षणासाठी राखी बांधते. पण यंदा या राखीतून बहिणी स्वतःच्या आणि इतर भगिनींच्या सन्मानासाठी रक्षण मागणार असून लव्ह जिहादविरोधात कायदेशीर संरक्षण हवे आहे. हेच यंदाच्या राखी पौर्णिमेच्या जनजागृतीचे केंद्रबिंदू ठरले आहे. या उपक्रमात किशोरी, गृहिणी, विद्यार्थिनी, महिला कर्मचारी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवणार असून काही ठिकाणी महिला भाषण व फलकांद्वारे समाजात जागरूकता पसरवणार आहेत.

सकल हिंदू समाजाने येत्या काळात प्रत्येक लोकप्रतिनिधींना निवेदन देण्याची तयारी केली असून, शहराबरोबरच जिल्हा पातळीवर कार्यशाळा, चर्चासत्रे व जनजागृती मोहिम राबवली जाणार आहे. सोशल मिडिया मोहिम, लव्ह जिहाद पीडितांच्या साक्षात्कारांचे प्रसारण आणि कायद्याच्या मागणीसाठी पत्र मोहिम देखील उभारण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अहिल्यानगर जिल्हा पर्यावरण समिती पुनर्गठीत

### सुरेश खामकर, डॉ. सुनील म्हस्के, डॉ. सतीश कुलकर्णी, गणेश बोऱ्हाडे यांची वर्णी









नगर – जिल्हास्तरावर पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच पर्यावरण विषयक व्यापक जनजागृतीच्या कार्यक्रमांच्या यशस्वी व सक्षम अंमलबजावणीसाठी आणि पर्यावरणाशी संबंधित सर्व विभागांशी समन्वयन करून स्थानिक पर्यावरणीय समस्या शोधून त्यावरील उपाययोजनांची शिफारस करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल प्राप्त करून घेणे आणि या अहवालावर सखोल चर्चा करून शिफारशी करणे. पर्यावरणाचा ऱ्हास झालेल्या नैसर्गिक संसाधनांचे सर्वेक्षण करून अशा संसाधनांच्या संवर्धनासाठी शासनास शिफारस करणे व शासनाच्या मान्यतेने उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी सनियंत्रण करणे. पर्यावरण विषयक दिन, स्पर्धा, विविध कार्यक्रमाचे आयोजन करून व्यापक जनजागृती करणे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या विकास योजना/ प्रकल्पामुळे होणाऱ्या जिल्ह्यातील पर्यावरण ऱ्हासावर उपाययोजना शासनास सुचवणे व शासनाच्या निर्देशानुसार त्यावर अंमलबजावणी करणे. आदी अनुषंगिक कामाकरिता केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय आणि महाराष्ट्र पर्यावरण मंत्रालयाने जिल्हा पातळीवर जिल्हा पर्यावरण समितीचे गठन करण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हा पर्यावरण समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी नुकतेच जिल्हा पर्यावरण समितीचे पुर्नगठन केले. या समिती मध्ये सदस्य म्हणून जिल्ह्यातील सर्व विद्यमान आमदार, विधान परिषद सदस्य, पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ सदस्य म्हणून डॉ. सतीश कुलकर्णी, डॉ. सुनील म्हस्के यांची तर पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी म्हणून हरियाली संस्थेचे अध्यक्ष सुरेश खामकर, गणेश बोऱ्हाडे तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा उद्योग अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा जनसंपर्क व माहिती अधिकारी, जिल्हा वन अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी सदस्य सचिव असणार आहेत.



सर्वधर्मीय गरीब, गरजूंसाठी मुकुंदनगर येथे 'मोफत रोटी केंद्र' सुरू करण्यात आले आहे.

# सर्वधर्मीय गरीब, गरजूंसाठी मुकुंदनगर येथे 'मोफत रोटी केंद्र' सुरू

नगर – मुकुंदनगर येथील किंग बेकरी, गोसिया मशीद जवळ सर्वधर्मीय गरीब व गरजू लोकांसाठी मोफत रोटी केंद्राची (रोटी बँक) सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने करण्यात आले. यावेळी हाजी सय्यद मुनीर, मन्सूर सय्यद, हाजी मुस्ताक सय्यद, मेराज शेख, मुन्नसी शेख, कादर शेख, रशीद शेख, मौलाना ताजमुल, नासिर शेख, शफी शेख, इस्माईल शेख, फारुक शेख, बबलू शेख तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

या रोटी बँकेच्या माध्यमातून दररोज सुमारे ७० ते ८० गरजू नागरिकांना मोफत शुद्ध, ताजे अन्न – रोटी दिली जाणार आहे.

या उपक्रमाबद्दल माहिती देताना हाजी सय्यद मुनीर म्हणाले की, गरजूंना अन्नाची कमतरता भासू नये, कोणताही माणूस अन्नापासून वंचित राहू नये. त्या भावनेतून हा सामाजिक उपक्रम चालू करण्यात आला असल्याचे त्यानी सागितले. व हा उपक्रम समाजातील एकतेचे प्रतीक ठरनार असून, गरजूंना दिलासा देणारे हे रोटी केंद्र ठरणार आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणुकीत नाचण्यावरुन तरुणासह दोन महिलांना मारहाण

नगर – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त नगर शहरात काढण्यात आलेल्या मिरवणुकीमध्ये नाचण्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून चौघांनी तरुणास लोखंडी हत्याराने व दोन महिलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ करुन धमकी दिल्याची घटना शहरातील आशा टॉकीज चौक येथे १ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत रोहित गुरनाम सिंग (वय २०, रा. एकविरा चौक, पद्मानगर,पाईपलाईन रोड) याने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. अखंड रामवाडी मित्रमंडळाच्या वतीने १ ऑगस्ट रोजी आयोजित केलेली मिरवणुक शहरातील आशा टॉकीज चौकात आली असता, फिर्यादी व त्याचे मित्र मिरवणुकीत नाचत होते. त्यावेळी फिर्यादीची आई व मावशी या तेथे मिरवणूक पाहत होत्या. त्याच वेळेस मिरवणुकीत नाचण्याच्या कारणावरुन धक्काबुक्की झाली. या झटापटीत मिरवणुकीत नाचणारा फिर्यादीच्या ओळखीचा दीपक चांदणे (रा. रामवाडी, सर्जेपुरा, अ.नगर) याने फिर्यादीशी वाद घालून झटापट केली. त्यावेळेस फिर्यादी त्यास समजावण्याचा प्रयत्न करीत असताना त्याने फिर्यादीस शिवीगाळ करुन, त्याच्या हातात असलेल्या टणक लोखंडी हत्याराने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण केली. त्याच्यासोबत असणाऱ्या तीन अनोळखी इसमानी फिर्यादी यास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे पाहून फिर्यादीची आई व मावशी फिर्यादी यास सोडवण्याकरता मध्ये आल्या असता दीपक चांदणे व त्याच्यासोबत असलेल्या तीन अनोळखी इसमांनी दोघींनाही लाथाबुक्क्याने मारहाण करुन शिवीगाळ केली.

यावेळी झालेल्या झटापटीत फिर्यादीच्या मावशीच्या गळ्यातील सोन्याची पोत तुटून कोठेतरी पडून गहाळ झाली. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्यावर गंभीर मारहाण झाल्याने त्यास औषध उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात रोहित सिंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दीपक चांदणे व तीन अनोळखी इसमाविरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# नगर-पुणे महामार्गावर दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पकडली

### ४ दिवसांपूर्वीच्या जबरी चोरीचा गुन्हा उघड, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – सुपा परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडली आहे. या टोळीतील २ सराईत गुन्हेगार आणि एक अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले असून त्यांचे २ साथीदार मात्र पसार झाले आहेत. पकडलेल्या तिघांकडून कोयता, १८ हजारांची रोकड व एक पल्सर मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. याच टोळीने २९ जुलै रोजी पहाटे पळवे गावात ३ ठिकाणी कोयत्याचा धाक दाखवत जबरी चोरी केल्याचे उघड झाले आहे.



दरोड्याच्या तयारीतील असलेली टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर पुणे महामार्गावर तसेच सुपा पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्या, लुटमारीच्या घटना वाढू लागल्याने पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी पो. नि. स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.किरणकुमार कबाडी यांना या टोळ्यांचा बंदोबस्त करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील स.पो.नि.हरिष भोये, पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, बिरप्पा करमल, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ, भगवान धुळे यांचे पथक तयार करुन त्यांना गुन्हे उघडकिस आणणे बाबत सुचना देवुन रवाना केले होते.

तपास पथक ३१ जुलै रोजी रात्री सुपा पोलीस स्टेशन हद्दीत दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना स.पो.नि.हरिष भोये यांना गोपनीय माहिती मिळाली की, शाम सुरेश उर्फ पैदास चव्हाण (रा. विटेकरवाडी, ता. श्रीगोंदा) हा व त्याचे इतर साथीदार म्हसणे गांवचे शिवारातील म्हसणे फाटा ते पारनेर जाणारे रोडवर दरोडा घालण्याचे तयारीत अंधारात थांबलेले आहेत. ही माहिती मिळताच पथकाने रात्री १ वाजण्याच्या सुमारास तेथे जावुन खात्री केली असता म्हसणे फाटा ते पारनेर जाणारे रोडचे कडेला अंधारामध्ये दोन मोटारसायकलजवळ ५ इसम अंधारामध्ये थांबल्याचे दिसुन आले. पथक सदर इसमांना ताब्यात घेण्याचे प्रयत्नामध्ये असतांना त्यातील दोन इसम एका मोटारसायकलवर बसुन भरधाव वेगात निघुन गेले. उर्वरीत तीन संशयीतांना ताब्यात घेतले. त्यामध्ये शाम सुरेश उर्फ पैदास चव्हाण (वय २४, रा. विटेकरवाडी, काळेवाडी, ता. श्रीगोंदा), विशाल गणेश भोसले (वय २१, रा. बाबुर्डी, ता. पारनेर) व एक १७ वर्षीय मुलगा यांचा समावेश आहे. शाम सुरेश चव्हाण याचेकडे पळुन गेलेल्या इसमांचे नावे विचारल्यावर त्याने ऋतिक सुरेश उर्फ पैदास चव्हाण (रा. पारगांव, बेलवंडी, ता. श्रीगोंदा), प्रशांत दिलीप चव्हाण (रा. लक्ष्मीनगर, कोपरगांव, ता. कोपरगांव)असल्याचे सांगितले. ताब्यात घेतलेल्या तिघांची घेतली असता एक लोखंडी कोयता, १८ हजार रुपये रोख रक्कम, १ लाख रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल असा एकुण १ लाख १८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला. तो जप्त करण्यात आला आहे.

ताब्यातील आरोपीकडे त्यांनी इतर गुन्हे केले आहे काय याबाबत कसून चौकशी केल्यावर त्यांनी २९ जुलै रोजी पहाटे पळवे गावात शिवाजी बबन कळमकर यांच्या सह ३ ठिकाणी कोयत्याचा धाक दाखवत जबरी चोरी केल्याचे उघड झाले आहे. या तिघा आरोपींवर आणि पसार झालेल्या दोघांवर सुपा पोलिस ठाण्यात दरोड्याच्या तयारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मिरवणुकीत मंडळाच्या अध्यक्षाला शिवीगाळ

### विक्रम राठोड यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

नगर – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या मिरवणुकीत मंडळाचा अध्यक्ष असलेल्या एका तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याची घटना नगर शहरातील चितळे रोडवरील नेता सुभाष चौक येथे १ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी युवासेनेचे विक्रम राठोड यांच्यावर तोफखाना पोलिस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत योगेश बाबासाहेब सोनवणे (वय ३१, रा. विक्रम मोटर्स शेजारी, सर्जेपुरा, अ. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. गुरुदत्त युवा प्रतिष्ठान, सर्जेपुरा या मंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त डी जे सिस्टीम लावून मिरवणूक काढण्यात आली होती. रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास मिरवणूक नेता सुभाष चौकात पोहोचली असता विक्रम अनिल राठोड (रा. नेता सुभाष चौक, अ.नगर) याने कोणतेही कारण नसताना मिरवणुकी दरम्यान मंडळाचे अध्यक्ष योगेश सोनवणे यांना उद्देशून जातिवाचक शिवीगाळ करीत धक्काबुक्की केली.

या प्रकरणी योगेश सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विक्रम राठोड यांच्याविरुद्ध भारतीय न्याय. संहिता कलम ११५ (२), ३५२ व अनुसूचित जाती आणी जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ चे सुधारित २०१५ अंतर्गत कलम ३ (१) (आर) (एस) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती हे करीत आहेत.

# भिंगारमध्ये मिरवणुकीत कोयता घेवून फिरणाऱ्याला पकडले

नगर – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त भिंगार मध्ये निघालेल्या मिरवणुकीत धारदार कोयता घेवून फिरणाऱ्याला अल्पवयीन मुलास भिंगार कॅम्प पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडील कोयता जप्त केला. ही कारवाई भिंगार येथील नगर पाथर्डी रोडवरील पंचशील कमानीजवळ १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

भिंगार शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जयंती निमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकी दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी भिंगार पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. मिरवणुकी दरम्यान पंचशील कमानीजवळ एक १६ वर्षीय मुलगा संशयितरित्या हालचाल करीत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्यास थांबवून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे कोयता मिळून आला. पोलिसांनी कोयता जप्त करुन त्यास चौकशीसाठी ताब्यात घेतले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी पोलीस हवालदार दत्तात्रय मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अल्पवयीन मुलाविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७ (१) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



यशवंत कॉलनी परिसरात (प्रभाग ४) साईदीप हॉस्पिटल जवळ चेंबर तुंबल्यामुळे सांडपाणी आजूबाजूच्या परिसरात वाहत आहे. त्यामुळे नागरिकांचे त्याचबरोबर येथे जिल्हाभरातून येणाऱ्या रूग्णांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने त्वरित उपाययोजना करण्याची मागणी येथील नागरिक करीत आहे. (छाया – महावीर पोखरणा)



साहित्यरत्न लोकशाहिर डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त अभिवादन करताना मनसे उपशहराध्यक्ष दिपक दांगट. समवेत सौ. आरती उपाळे, संतोष जाधव आदि.

# भिंगारच्या पुरातन शनी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी डॉ. सुजय विखे यांचा निधी उपलब्ध : वसंत राठोड



भिंगार शहरातील पुरातन शनी मंदिराच्या जीर्णोद्धार कामाच्या सर्व प्रशासकीय मंजुरीची व मंजूर प्लॅनची फाईल छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी शशिकांत सुतार यांच्या कडे सुपूर्द करून लवकरात लवकर काम सुरु करण्याची विनंती केली.

नगर – भिंगार येथील पुरातन शनी मंदिराचा जीर्णोद्धाराचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला असून तत्कालीन खासदार डॉ.सुजय विखे यांनी मंजूर केलेला विकास निधी आता उपलब्ध झाला आहे.भिंगार छावणी परिषदेच्या अवघड प्रक्रियेमुळे रखडलेल्या सर्व प्रशासकीय परवानग्या व प्लॅन मंजुरीसाठी बराच पाठपुरावा करावा लागला. आता सतत केलेल्या पाठपुराव्यामुळे सर्व मंजुऱ्या प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे भिंगार मधील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या पुरातन शनी मंदिराचा जीर्णोद्धार, सुशोभीकरण व संरक्षण भिंत बांधण्याच्या कामाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. भिंगार छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांनी या महत्त्वाच्या कामासाठी मंजुरी देत केलेल्या सहकार्याबद्दल तसेच डॉ. सुजय विखे यांनी विकासनिधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो, अशी माहिती भिंगार छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी दिली.

भिंगार शहरातील शुक्रवार बाजारतळ येथे असलेले पुरातन शनी मंदिर हे शनी शिंगणापूरच्या मंदिरा पेक्षाही प्राचीन आहे. या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी वसंत राठोड यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर सर्व प्रशासकीय मंजुरी व प्लॅनला परवानगी नुकतीच मिळाली आहे. या कामाची फाईल वसंत राठोड यांनी शुक्रवारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी शशिकांत सुतार यांच्याकडे सुपूर्द करून लवकरात लवकर मंदिराच्या कामास सुरवात करण्याची विनंती केली. अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या भगवान शनीदेवांच्या या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धार कामास आता लवकरच सुरुवात होणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे व आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते हा भूमिपूजन सोहळा लवकरच होणार आहे, अशी माहिती किशोर कटोरे यांनी दिली.

यावेळी संतोष बोरुडे, प्रकाश शेलार, आनंद बोथरा, नाना मोरे, शाम घुले, विनय वराडे, सुनील हळगावकर, राहुल लिपारे, निलेश पराते उपस्थित होते.

